(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९९] सप्प. ४ एस. सी. आर. २०५

मुंबई येथील उच्च न्यायालय तर्फे प्रबंधक

- विरुद्ध -

शशीकांत एस. पाटील आणि अन्य

२८ ऑक्टोबर, १९९९

[के. टी. थॉमस, ए. पी. मिश्रा आणि सय्यद शाह मोहम्मद कादरी, न्यायमूर्ती]

सेवा कायदाः

विभागीय चौकशी मधील निष्कर्षाचे शिस्तभंग प्राधिकारीवरील बंधनात्मक स्वरूप - असा निर्णय देण्यात आला कि : चौकशीचा उद्देश प्रामुख्याने दोषी अधिकाऱ्याला आरोपांवर आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे हा आहे- चौकशी अधिकाऱ्याचा निष्कर्ष शिस्तभंग प्राधिकारीवर बंधनकारक नाही - शिस्तभंग अधिकारी चौकशी अधिकाऱ्याची मते लक्षात घेऊन स्वतःच्या निष्कर्षावर येऊ शकतात अन्यथा, शिस्तभंग प्राधिकरणाचे पद गौण स्तरावर जाईल – प्रस्तुत प्रकरणाच्या परिस्थितीत, उच्च न्यायालयाने शिस्तभंग प्राधिकरणाचद्वारे सुविचारित पारित केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्यात चूक केली - भारताचे संविधान, १९५०, अनुच्छेद २२६.

भारताचे संविधान, १९५०:

अनुच्छेद २३५ - उच्च न्यायालयाचे अधिकार- गैरवर्तणूक - अधीनस्थ न्यायपालिका - एखाद्या सदस्याची अप्रामाणिक कामगिरी - असा निर्णय देण्यात आला कि : अधीनस्थ न्यायपालिकेच्या सदस्याची अप्रामाणिक कामगिरी टाळणे उच्च न्यायालयाला परवडू शकत नाही-उच्च न्यायालयाने अशा अप्रामाणिक कामगिरीला माफ करणे किंवा त्याच्याशी तडजोड केल्याचे कोणतेही उदाहरण म्हणजे हे न्यायिकव्यस्थेच्या पायाची झीज करणे आहे.

अनुच्छेद २३५ - न्यायाधीशांची भूमिका आणि त्यांचे कर्तव्य असा निर्णय देण्यात आला कि : नोकरशाही किंवा इतर सेवेतील सदस्यांप्रमाणे न्यायाधीश, कोणत्याही स्तरावरील, राज्य आणि त्याच्या प्राधिकाराचे प्रतिनिधित्व करतात - न्यायिक सेवा ही केवळ रोजगार नाही किंवा न्यायाधीश केवळ कर्मचारी नाहीत-न्यायाधीश सार्वभौम न्यायिक

शक्तीचा वापर करतात आणि मोठ्या विश्वास आणि जबाबदारी असलेल्या सार्वजनिक पदांचे धारक असतात.

अनुच्छेद २२६ – याचिका - विभागीय प्राधिकरणाच्या निर्णयामध्ये - अनुमतीसह हस्तक्षेप - असा निर्णय देण्यात आला कि : कार्यवाही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे किंवा वैधानिक नियमांचे उल्लंघन करीत असल्यास किंवा बाह्य विचारांमुळे किंवा पूर्णपणे मनमानी किंवा लहरी इ. द्वारे दूषित असल्यास अनुज्ञेय आहे - जर चौकशी योग्य प्रकारे केली गेली तर विभागीय प्राधिकारी हा तथ्यांचा एकमेव न्यायाधीश असतो - अशा प्रकरणांमध्ये, अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाचा हस्तक्षेप आवश्यक नाही.

उत्तरवादी, *महाराष्ट्र न्यायिक सेवे अंतर्गत दिवाणी सहन्यायधिश, कनिष्ठ स्तर*, होते यांनी एका प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता केली. परंतु तक्रारदाराने जिल्हा आणि सत्र न्यायाधीशांकडे याचिका पाठवून आरोप केला की उत्तरवादीने जारी केलेल्या अटक वॉरंटनुसार त्याला पोलिसांनी दोषपूर्ण रीतीने अटक केली; त्याला हातकडी घालून त्याच्या परिसरातील रस्त्यांवर फिरवले गेले आणि रात्री त्याला लॉक-अपमध्ये ठेवण्यात आले.

उच्च न्यायालयाने उत्तरवादी विरुद्ध आरोप निश्चित केले आणि आरोपांची औपचारिक चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केली. चौकशी अधिकाऱ्याने उत्तरवादी ला आरोपातून मुक्त करणारा अहवाल सादर केला. परंतु उच्च न्यायालयाच्या शिस्तभंग समितीने चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांशी सहमती दर्शवली नाही आणि त्याला नोकरीून बडतर्फ करण्याचा मोठा दंड का ठोठावला जाऊ नये याचे कारण दर्शविण्यासाठी उत्तरवादी ला नोटीस बजावली. शिस्तभंग समितीने कारणे दाखवा नोटीससाठी उत्तरवादीच्या निवेदनाशी सहमती दर्शवली नाही आणि उतरवादीच्या अनिवार्य निवृत्तीची शिफारस केली, ज्याला राज्यपालांनी मान्यता दिली.

तथापि, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने उत्तरवादी च्या अनिवार्य निवृत्तीचा आदेश या आधारावर रद्दबातल ठरवला की शिस्तभंग समितीने तथ्यांवर तपशीलवार चर्चा करणे आणि स्वतःचे निष्कर्ष नोंदवण्यापूर्वी चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांना आव्हान देणे अनिवार्य होते. म्हणून, हे अपील.

अपीलाला मंजूर करताना न्यायालयाने,

असा निर्णय दिला कि : १. जर अशा प्राधिकरणाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन करून किंवा अशा चौकशीची पद्धत निर्धारित करणाऱ्या वैधानिक नियमांचे उल्लंघन करून कार्यवाही केली असेल किंवा जर प्रकरणाच्या पुराव्याच्या आणि गुणवत्तेच्या बाहेरील विचारांमुळे प्राधिकरणाचा निर्णय दूषित झाला असेल किंवा प्राधिकरणाने केलेला निष्कर्ष पूर्णपणे मनमानी किंवा लहरी असेल की कोणताही वाजवी व्यक्ती अशा निष्कर्षावर पोहोचू शकला नसता किंवा वरील गोष्टींशी अगदी साम्य असलेली कारणे असतील तर अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करताना विभागीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास परवानगी दिली जाऊ शकते. परंतु जर चौकशी योग्य प्रकारे पार पडली असेल तर विभागीय प्राधिकरण (या प्रकरणात उच्च न्यायालयाची शिस्तभंग समिती) हे तथ्यांचे एकमेव न्यायाधीश आहेत याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. निश्चित कायदेशीर स्थिती अशी आहे की जर काही कायदेशीर पुरावे आहेत ज्यावर निष्कर्ष आधारित असू शकतात, तर त्या पुराव्याची समूचितता किंवा विश्वासार्हता देखील संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत दाखल केलेल्या रिट मध्ये उच्च न्यायालयासमोर याचना करण्यायोग्य प्रकरण नाही. [२०२ - एफ, जी, एच; २१२-ए]

स्टेट ऑफ ए. पी. -विरुद्ध - एस. श्री रामाराव, [१९६४] ३ *एस. सी. आर.* २५ आणि *बी. सी. चतुर्वेदी -विरुद्ध - युनियन ऑफ इंडिया,* [१९९५] ६ एस. सी. सी. ७४९, यावर अवलंबून होते.

२.१. शिस्तभंग समिती ही चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालावर अपील करणारी किंवा पुनर्निरीक्षण करणारी संस्था नव्हती. हे लक्षात घेतले पाहिजे की चौकशीचा उद्देश प्रामुख्याने दोषी अधिकाऱ्याला त्याच्याविरुद्ध लावलेल्या आरोपांवर आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देणे आणि अशा चौकशीत गोळा केलेले पुरावे तसेच त्यावर चौकशी अधिकाऱ्याने मांडलेले मत शिक्षा करणाऱ्या प्राधिकारीस सादर करण्यात यावे, असे आहे. चौकशी अधिकाऱ्याचे निष्कर्ष हे मात्र गोळा केलेल्या पुराव्यावरील त्याचे मत असते, परंतु असे निष्कर्ष शिस्तभंग प्राधिकारीवर बंधनकारक नसतात कारण निर्णय देणारे प्राधिकारी हे शिक्षा देणारे प्राधिकारी असते, सबब, ते प्राधिकारी चौकशी अधिकाऱ्याने व्यक्त केलेली मते लक्षात घेऊन स्वतःच्या निष्कर्षावर, नक्कीच येऊ शकते. परंतु शिस्तभंग प्राधिकरणाने "पुराव्यावर तपशीलवार चर्चा करावी आणि चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांना विरोध

करावा" हे आवश्यक नाही. अन्यथा, शिस्तभंग प्राधिकरणाचे पद गौण स्तरावर जाईल. [२१३- ई-एफ-जी-एच]

२.२. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सदर प्रश्नाकडे योग्य दृष्टीकोनातून पाहिले नाही, जे तेव्हा स्पष्ट होते जेव्हा खंडपीठाने सांगितले की, शिस्तभंग समितीने पुराव्यावर तपशीलवार चर्चा करणे आणि चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांना आव्हान देणे अनिवार्य आहे. उच्च न्यायालयाने संमत केलेल्या सुविचारित आदेशात खंडपीठाने केलेला हस्तक्षेप हा प्रशासकीय बाजूने अनुच्छेद २२६ अंतर्गत त्यांच्या अधिकारक्षेत्राचे अतिक्रमण होते .[२१४- डी]

ए. एन. डी. सिल्वा वि. युनियन ऑफ इंडिया, [१९६२] सप्ल.१ एस. सी. आर. ९६८ आणि *युनियन ऑफ एफ इंडिया विरुद्ध एच. सी. गोयल.,* [१९६४] ४ एस. सी. आर. ७१८, वर अवलंबून होते.

३. प्रशासकीय बाबींवर प्रत्येक उच्च न्यायालयाचे त्याच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या अधीनस्थ न्यायव्यवस्थेवर पहारा ठेवणे हे घटनात्मक कर्तव्य आहे. सर्व गैरकल्पित किंवा प्रेरित तक्रारींपासून प्रामाणिक न्यायिक अधिकाऱ्यांना संरक्षण देणे उच्च न्यायालयासाठी अत्यावश्यक असले तरी, अधीनस्थ न्यायपालिकेच्या सदस्याची कोणतीही अप्रामाणिक कामगिरी टाळणे उच्च न्यायालयाला परवडत नाही. अप्रामाणिकपणा हा न्यायालयीन प्रामाणिकपणाच्या अगदी विरुद्ध आहे. उच्च न्यायालयाने आपल्या एका अधिकाऱ्याच्या अप्रामाणिक कामगिरीला माफ करणे किंवा त्याच्याशी तडजोड केल्याचे कोणतेही उदाहरण म्हणजे न्यायिकव्यस्थेच्या पायाची झीज होण्यास हातभार लावेल. दर तासाला एखाद्याने स्वतःला आठवण करून दिली पाहिजे की न्यायपालिका मात्र त्याच्या प्रामाणिकपणावर लोकांचा असणारा विश्वास यावर उभारलेली असते .असा आत्मविश्वास हा असा पाया आहे ज्यावर न्यायपालिकेचे स्तंभ उभारले जातात.[२१४ - एफ, जी]

४. नोकरशाही किंवा इतर सेवेतील सदस्यांप्रमाणे न्यायाधीश, कोणत्याही स्तरावरील, राज्य आणि त्याच्या प्राधिकाराचे प्रतिनिधित्व करतात. न्यायिक सेवा ही केवळ रोजगार नाही किंवा न्यायाधीश केवळ कर्मचारी नाहीत. ते सार्वभौम न्यायिक शक्तीचा वापर करतात. ते मोठ्या विश्वास आणि जबाबदारी असलेल्या सार्वजनिक पदांचे धारक असतात. जर एखाद्या

न्यायालयीन अधिकाऱ्याने "न्यायाचे प्रमाण कमी केले तर त्याचा उलथापालथ करणारा परिणाम विनाशकारी आणि घातक ठरेल." अप्रामाणिक न्यायिक व्यक्तिमत्व हा एक विरोधाभास आहे. [२१४- एच; २१५ -ए]

मुंबई उच्च न्यायालय वि. शिर्शकुमार रंगराव पाटील, **[१९९७] ६ एस. सी. सी. ३३९, यावर अवलंबून होते.**

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. १६५६/१९९८.

डब्ल्यू. पी. क्र.२११०/१९९६ मधील मुंबई उच्च न्यायालया चे दिनांक १८/०२/९८ रोजीचे न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्याची बाजू अतिरिक्त महान्यायअभिकर्ता डॉ. डी. वाय. चंद्रचूड आणि जी. बी. साठे यांनी मांडली.

प्रतिवादींसाठी यू. यू. ललित आणि अपराजित सिंग.

न्यायालयाचा न्यायनिर्णय **थॉमस न्यायमूर्ती** यांनी दिला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय बाजूवरील पाच न्यायाधीशांच्या पॅनेलने एका न्यायिक दंडाधिकाऱ्याचे त्याच्या न्यायिक अधिकारवस्त्र उतरवले आहेत. एका निष्पाप फिर्यादीला चुकीच्या पद्धतीने अटक, हातकडी आणि सार्वजनिक ठिकाणी मिरवणूक काढण्याचा हा पुढचा भाग होता. परंतु त्याच उच्च न्यायालयाच्या इतर दोन न्यायाधीशांनी, न्यायालयीन बाजूवरील, त्याला पुन्हा पूर्ण न्यायालयीन पोशाख घालण्याचे आदेश दिले. खंडपीठाच्या न्यायनिर्णयाला आता मुंबई उच्च न्यायालयाचे प्रबंधक (उक्त उच्च न्यायालयाच्या वतीने) विशेष अनुज्ञेद्वारे आव्हान देत आहेत.

उत्तरवादी क्र. १ हे महाराष्ट्र न्यायिक सेवे अंतर्गत दिवाणी सहन्यायधिश, कनिष्ठ स्तर, होते. अहमदनगर येथे न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी म्हणून काम करत असताना त्यांना पोलीस अहवालाच्या आधारे दाखल केलेल्या फौजदारी खटल्यास सामोरे जावे लागले ज्यामध्ये तक्रारदार रणछोडदास गोविंददास गांधी (यापुढे 'तक्रारदार' म्हणून संदर्भित) होते. उत्तरवादी क्र. १ यांनी दि. ०७/११/१९८५ रोजी आरोपीची निर्दोष मुक्तता करून या प्रकरणात निकाल जाहीर केला. पण दंडाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या अटक वॉरंटनुसार पोलिसांनी त्याला

दि. ५/१०/१९८५ रोजी चुकीच्या पद्धतीने अटक केली; आणि त्याला हातकडी घालून त्याच्या परिसरातील रस्त्यांवरून फिरवले; आणि रात्री त्याला लॉकअपमध्ये ठेवले; आणि दुसऱ्या दिवशी (१६/१०/१९८५) त्याला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले, असा आरोप करत तक्रारदाराने अहमदनगरच्या जिल्हा आणि सत्र न्यायाधीशांना दि. ०४/०१/१९८६ रोजी याचिका पाठवली. पुढे असा आरोप करण्यात आला कि, जेव्हा तक्रारदाराला खुल्या न्यायालयात हजर केले गेले, तेव्हा उत्तरवादी क्र. १ दंडाधिकारी, त्यांच्या कक्षात विश्राम करण्यास गेले आणि तक्रारदाराच्या सुटकेचे आदेश दिला. तक्रारीत पुढे असा आरोप करण्यात आला होता की गुन्हेगारी प्रकरणातील आरोपींच्या सांगण्यावरून गुप्तपणे व्यवस्थापित केलेल्या अटकेच्या बेकायदेशीर वॉरंटद्वारे या अटकेमध्ये जाणीवपूर्वक फेरफार करण्यात आला.

प्राथमिक चौकशी केल्यानंतर उच्च न्यायालयाने उत्तरवादी क्र. १ विरुद्ध आरोप निश्चित केले आणि आरोपांची औपचारिक चौकशी करण्यासाठी जिल्हा सहन्यायाधीश (चौकशी अधिकारी म्हणून) श्री. के. जे. रोही यांची नियुक्ती केली. त्यांनी दि. ०१/०३/१९९४ रोजी आरोपांतून उत्तरवादी क्र. १ ची निर्दोष मुक्तता करणारा अहवाल सादर केला. परंतु उच्च न्यायालयाच्या शिस्तभंग समितीने (मुंबई उच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांचा समावेश असलेली) चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालाची छाननी केल्यानंतर, त्यातील निष्कर्षांना मान्यता देण्यास समिती तयार झाली नाही. समितीने निष्कर्षांपेक्षा वेगळे मत व्यक्त केले आणि या प्रकरणात पुढे जाण्याचा प्रस्ताव दिला. त्यानंतर उत्तरवादी क्र. १ ला, त्याला महत्त्वाच्या मुद्द्यांवरील चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांना का नाकारले जाऊ नये आणि त्याला नोकरीन बडतर्फ करण्याचा मोठा दंड का ठोठावला जाऊ नये याचे कारण दर्शविण्यासाठी, नोटीस बजावण्यात आली होती.

उत्तरवादी क्र. १ ने उपरोक्त नोटीसवर आपले निवेदन सादर केले. उच्च न्यायालयाच्या शिस्तभंग समितीने सदर निवेदनावर विचार केला आणि त्यांच्या विरुद्ध केलेले आरोप सिद्ध झाले आहेत अशा सदर निष्कर्षावर येऊन सदर निवेदन नाकारण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे समितीने उत्तरवादी क्र. १ ला अनिवार्य निवृत्तीची शिक्षा ठोठावण्याची शिफारस करण्याचा निर्णय घेतला. राज्यपालांनी नंतर सदर शिफारशीवर उत्तरवादी क्र. १ ला अनिवार्यपणे निवृत्त करण्याचे आदेश जारी केले.

उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने उत्तरवादी क्र. १ वर अनिवार्य निवृत्ती लादण्याचा आदेश, शिस्तभंग समितीने चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांपेक्षा वेगळे असण्याची पुरेशी कारणे पुढे ठेवली नाहीत या कारणमिंमासेवरून रद्दबातल ठरवला. पुढे असेही नमूद करण्यात आले की, चौकशी अधिकारी कसा चुकला आणि त्याचे निष्कर्ष समितीला का मान्य झाले नाहीत, यावर शिस्तभंग समितीने चर्चा केली नाही. खंडपीठाने पहिल्या उत्तरवादी क्र. १ चा असा युक्तिवाद कायम ठेवला आहे की, "जेव्हा शिस्तभंग अधिकारी यांनी चौकशी अधिकाऱ्याने नोंदवलेल्या निष्कर्षांपेक्षा वेगळे नोंदवले असेल, तर पुराव्यावर तपशीलवार चर्चा अभिलेखने आणि चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांना आव्हान देणे आणि नंतर त्यांचे स्वतःचे निष्कर्ष नोंदवणे अत्यावश्यक आहे.

उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने खालीलप्रमाणे कायदेशीर प्रस्ताव मांडला आहेः

> “शिस्तभंग न्यायशास्त्रातील हे एक प्रस्थापित तत्त्व आहे की जेव्हा शिस्तभंग प्राधिकारी चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांपेक्षा वेगळे असते, तेव्हा त्यांना संपूर्ण प्रकरणाची सखोल चर्चा करावी लागते आणि हे सिद्ध करावे लागते की चौकशी अधिकाऱ्याचा प्रत्येक निष्कर्ष पूर्णपणे असंभवनीय होता, पुराव्याच्या प्रकाशात शिस्तभंग प्राधिकारीने काढलेला निष्कर्ष हा तो एकमेव निष्कर्ष आहे ज्या निष्कर्षावर जो एक सामान्य विवेकी माणूस पोहोचू शकतो .”

अपीलकर्त्याची बाजू मांडणारे विद्वान वकील डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांनी उपरोक्त तर्क सेवा कायद्यातील सुस्थापित तत्त्वांच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे आणि चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांची तुलना वैधानिक संस्थेच्या निष्कर्षांशी केली जाऊ शकत नाही किंवा शिस्तभंग समितीच्या अधिकारांना पुनर्निरीक्षण किंवा अपील प्राधिकरणाच्या अधिकारांच्या बरोबरीचे केले जाऊ शकत नाही. विद्वान वकिलांच्या म्हणण्यानुसार, खंडपीठाने चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षावर असहमती दर्शविण्याच्या शिस्तभंग समितीच्या अधिकाराबद्दल कायदेशीर आधारावर स्वतःची दिशाभूल केली आहे.

आपण उपरोक्त कायदेशीर पैलूचा विचार करण्यापूर्वी आणखी काही तथ्यात्मक तपशील स्पष्ट करणे आवश्यक आहे. उत्तरवादी क्र. १ दंडाधिकाऱ्यांनी फौजदारी खटल्यातील फिर्यादी साक्षीदारांना ३० ऑगस्ट १९८५ रोजी अटक वॉरंट जारी केले होते. जेव्हा तक्रारदार उपरोक्त आदेश न कळता दि. १६/०९/१९८५ रोजी न्यायालयात हजर झाला तेव्हा त्याला सहाय्यक सरकारी वकील (श्रीमती. ज्योत्स्ना राठोड) यांनी सांगितले की, त्यांच्याविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट प्रलंबित आहे. तिच्या सल्ल्यानुसार तक्रारदाराने वॉरंट रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केला आणि उत्तरवादी क्र. १ दंडाधिकाऱ्यांनी त्यावर वॉरंट रद्द करण्याचे आदेश दिले.

रद्द करण्याचा असा आदेश असूनही तक्रारदाराला दि. १५/१०/१९८५ रोजी अटक करण्यात आली आणि त्याला त्याच्या परिसरातील सार्वजनिक रस्त्यावरुन चालवण्याची बदनामी करण्यात आली आणि त्याला दि. १६/१०/१९८५ रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. त्या दिवशीही सहाय्यक सरकारी वकील श्रीमती. ज्योत्सना राठोड यांनी तक्रारदाराला विनाकारण अटक करण्यात आल्याचे उत्तरवादी क्र. १ दंडाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्याला मदत केली. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, आरोपी आणि त्याचे वकील दि. १६/१०/१९८५ रोजी न्यायालयात हजर होते, जेव्हा त्याला तिथे हजर करण्यात आले, जेव्हा कि त्या दिवशी प्रकरण लागलेले नव्हते. तक्रारदाराने उत्तरवादी क्र. १ दंडाधिकार्याविरुद्ध सत्र न्यायाधीशांकडे याचिका पाठवली आणि न्यायालयाच्या शिरस्तेदारने दंडाधिकार्यानी फौजदारी खटल्यातील आरोपीने त्याच्यावर घातलेल्या बेकायदेशीर प्रभावामुळे सदर अटक करण्याचा आरोप करत तक्रार केली.

उत्तरवादी क्र. १ दंडाधिकाऱ्याची सातत्यपूर्ण भूमिका अशी होती की वरील तक्रारदाराला दि. १५/१०/१९८५ रोजी अटक केल्याची कथा पूर्णपणे असत्य आहे आणि दि. १६/१०/१९८५ रोजी तक्रारदाराला किंवा कोणत्याही साक्षीदाराला त्याच्यासमोर हजर केले गेले नाही आणि तक्रारदाराने त्याच्याविरुद्ध खोटी याचिका दाखल केली कारण फौजदारी खटल्यातील आरोपींच्या सुटकेच्या आदेशामुळे त्याला खूप राग आला असता.

तक्रारदाराला दि. १५/१०/१९८५ रोजी अटक करण्यात आली आणि त्याला हातकडी घालून रस्त्यावर फिरवण्यात आले आणि दुसऱ्या दिवशी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले, तक्रारदाराने चौकशीत सर्व स्पष्ट तपशीलांसह या वस्तुस्थितीबद्दल बोलले आले.

तक्रारदाराला दि. १६/१०/१९८५ रोजी अटकेखाली न्यायालयात हजर केले गेले तेव्हा श्रीमती ज्योत्सना राठोड ह्या देखील न्यायालयात उपस्थित होत्या आणि तिने स्वतः अटकेचे वॉरंट पाहिले ज्या अंतर्गत त्याला ताब्यात घेण्यात आले होते अशी साक्ष देत, श्रीमती ज्योत्सना राठोड (चौकशीत तिची तपासणी होईपर्यंत ती न्यायाधीश, कनिष्ठ स्तर झालेली होती) यांनी कथेच्या त्या भागाला पूर्ण पाठिंबा दिला. याशिवाय, करमाला पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी पाठवलेल्या अहवालात असे दिसून आले आहे की त्यांनी ठाण्याच्या नोंदींची पडताळणी केली आणि त्यांना आढळले की रणछोडदास गोविंददास गांधी नावाच्या व्यक्तीला अटक करण्यासाठी दि. १५/१०/१९८५ रोजी अटक वॉरंट पोलिस ठाण्यात पोहोचले होते आणि त्यानुसार त्यांना अटक करण्यात आली आणि दुसऱ्या दिवशी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले.(उत्तरवादी क्र. १ चे विद्वान वकील उदय उमेश ललित यांनी असा युक्तिवाद केला की सहाय्यक पोलीस निरीक्षकांचा हा अहवाल चौकशी अधिकाऱ्याला उपलब्ध करून देण्यात आला नव्हता. तथापि, हे लक्षात घेतले पाहिजे की उत्तरवादी क्र. १ ला अशा अहवालाची माहिती होती कारण त्याने शिस्तभंग समितीने जारी केलेल्या कारणे दाखवा नोटीसला दिलेल्या उत्तरात त्याचा संदर्भ दिला होता).

सबब खालील तथ्ये स्फटिकाप्रमाणे स्पष्ट आहेतः पहिली गोष्ट म्हणजे, तक्रारदाराने दंडाधिकाऱ्यांनी आदेश दिलेले अटक वॉरंट रद्द करण्यासाठी दि. १६/०९/१९८५ रोजी अर्ज केला. दुसरा म्हणजे, एका महिन्यानंतर म्हणजेच, दि. १५/१०/१९८५ रोजी तक्रारदाराला पोलिसांनी उत्तरवादी क्र. १ ने जारी केलेल्या अटक वॉरंटखाली अटक केली आणि त्याला दि. १६/१०/१९८५ रोजी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले, ज्यांनी त्याची सुटका केली. उत्तरवादी क्र. १ ने केलेल्या त्या तथ्यांचे खंडन वास्तविक तथ्ये लपविण्यासाठी प्रेरित केले गेले.

तिसरे म्हणजे, ज्या अटक वॉरंट अंतर्गत तक्रारदाराला दि. १५/१०/१९८५ रोजी अटक करण्यात आली होती, तो दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयाच्या अभिलेखाचा भाग असावा. परंतु तपशीलवार शोध घेऊनही वरील वॉरंटचा शोध घेता आला नाही. त्या वॉरंटचा अशा प्रकारे गुप्तपणे गहाळ होणे ही एक मजबूत परिस्थिती आहे जी शिस्तभंग समितीने उत्तरवादी क्र. १ च्या विरोधात चालवून घेतली होती.

चौथी वस्तुस्थिती अशी आहे की सदर फौजदारी खटलयात आता उपलब्ध करून देण्यात आलेला रोझनामा (न्यायालयाची कामकाज डायरी) हा बनावट दस्तऐवज आहे. त्या बनावट रोझनाम्याचा मूळ रोझनाम्याचे आम्ही अवलोकन केले. सध्याचा रोझनामा हा बनावट दस्तऐवज आहे हे दाखवण्यासाठी विविध व्यापक आधारांची गणना करणे आमच्यासाठी अनावश्यक आहे, कारण उत्तरवादी क्र. १ चा वकील देखील त्याच्या बनावटपणाची स्पष्ट वैशिष्ट्ये स्पष्ट करू शकला नाही. उत्तरवादी क्र. १ च्या सध्याच्या भूमिकेनुसार हे इतके बनावटी होते की तक्रारदाराला अटक करण्यात आली नव्हती आणि दि. १६/१०/१९८५ रोजी त्याच्यासमोर हजर करण्यात आले नव्हते. हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की, उत्तरवादी क्र. १ यांनी, उपरोक्त बनावट रोझनामामध्ये ज्या ठिकाणी दंडाधिकाऱ्यांची स्वाक्षरी असायला हवी अशा अनेक ठिकाणी त्याची स्वाक्षरी आहे यावर आक्षेप घेतला नाही.

शिस्तभंग समितीने चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांशी असहमती दर्शविण्यासाठी आपल्या कार्यवाहीत वरील सर्व कारणमिंमासा नमूद केली. खरे तर अशी सर्व कारणमिंमासा शिस्तभंग समितीने उत्तरवादी क्र. १ ला जारी केलेल्या सूचनेत नमूद केली आहेत ज्यात चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांशी असहमती का दर्शविली जावी यासाठी त्याला कारण दर्शविणे आवश्यक आहे.

उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय/शिस्तभंग प्राधिकरणाच्या आदेशाविरूद्ध अपील केल्याप्रमाणे या खटल्याचे अवलोकन केल्याचे दिसते. जर अशा प्राधिकारीने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन करून किंवा अशा चौकशीची पद्धत निर्धारित करणाऱ्या वैधानिक नियमांचे उल्लंघन करून कार्यवाही केली असेल किंवा जर प्राधिकारीचा निर्णय खटल्याच्या पुराव्याच्या आणि गुणवत्तेच्या बाहेरील विचारांमुळे दूषित झाला असेल, किंवा जर प्राधिकारीने केलेला निष्कर्षच्या अगदी दर्शनीपणे, पूर्णपणे मनमानी किंवा लहरी असेल की कोणताही वाजवी व्यक्ती अशा निष्कर्षावर पोहोचू शकला नसता किंवा वरील गोष्टींशी अगदी साम्य असलेली कारणे असतील, तर संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करताना विभागीय अधिकाऱ्यांच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास परवानगी दिली जाऊ शकते. परंतु जर चौकशी योग्य प्रकारे पार पडली असेल तर विभागीय प्राधिकरण (या प्रकरणात उच्च न्यायालयाची शिस्तभंग समिती) हे

तथ्यांचे एकमेव न्यायाधीश आहेत याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. निश्चित कायदेशीर स्थिती अशी आहे की जर काही कायदेशीर पुरावे आहेत ज्यावर निष्कर्ष आधारित असू शकतात, तर त्या पुराव्याची समूचितता किंवा विश्वासार्हता देखील संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत दाखल केलेल्या रिट मध्ये उच्च न्यायालयासमोर याचना करण्यायोग्य प्रकरण नाही.

स्टेट ऑफ ए. पी. -विरुद्ध - एस. श्री रामाराव, [१९६४] ३ *एस. सी. आर.* २५ मध्ये, या न्यायालयाने असे म्हटले आहे आणि पुढे असे निरीक्षण नोंदवले आहे:

> "संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांच्या निर्णयावर अपील न्यायालय म्हणून उच्च न्यायालयाची स्थापना केली जात नाहीः त्याकरीता सक्षम प्राधिकारीद्वारे आणि त्या साठी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार चौकशी केली जाते की नाही आणि नैसर्गिक न्यायाच्या नियमांचे उल्लंघन केले जाते की नाही हे निर्धारित करण्याशी संबंधित आहे. चौकशी करण्याचे कर्तव्य सोपवण्यात आलेल्या प्राधिकरणाने काही पुरावे स्वीकारले आहेत का आणि दोषी अधिकारीवर लावण्यात आलेल्या दोषांप्रमाणे तो दोषी आहे या निष्कर्षाला कोणते पुरावे वाजवीपणे समर्थन देऊ शकतात, ह्या पुराव्याचा आढावा घेणे हे संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये दाखल याचिके मध्ये करणे आणि पुराव्यावर स्वतंत्र निष्कर्षापर्यंत पोहोचणे हे उच्च न्यायालयाचे कार्य नाही."

या न्यायालयाने त्यानंतरच्या निर्णयांमध्ये वरील भूमिकेचा पुनरुच्चार केला आहे. त्यापैकी एक म्हणजे बी. सी. चतुर्वेदी - विरुद्ध - *युनियन ऑफ इंडिया,* [१९९५] ६ एस. सी. सी. ७४९.

जेव्हा शिस्तभंग समिती चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षापेक्षा वेगळी असते, तेव्हा पुराव्यावर तपशीलवार चर्चा करणे आणि चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षाला आव्हान देणे अत्यावश्यक असते, हा उच्च न्यायालयाचा युक्तिवाद अगदी चुकीचा आणि प्रशासकीय कायद्यातील प्रस्थापित तत्त्वांच्या विरोधात आहे. शिस्तभंग समिती ही चौकशी अधिकाऱ्याच्या अहवालावर अपील करणारी किंवा पुनर्निरीक्षण करणारी संस्था नव्हती. हे लक्षात घेतले

पाहिजे की चौकशीचा उद्देश प्रामुख्याने दोषी अधिकाऱ्याला त्याच्याविरुद्ध लावलेल्या आरोपांवर आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देणे आणि अशा चौकशीत गोळा केलेले पुरावे तसेच त्यावर चौकशी अधिकाऱ्याने मांडलेले मत शिक्षा करणाऱ्या प्राधिकारीस सादर करण्यात यावे, असे आहे. चौकशी अधिकाऱ्याचे निष्कर्ष हे मात्र गोळा केलेल्या पुराव्यावरील त्याचे मत असते, परंतु असे निष्कर्ष शिस्तभंग प्राधिकारीवर बंधनकारक नसतात कारण निर्णय देणारे प्राधिकारी हे शिक्षा देणारे प्राधिकारी असते, सबब, ते प्राधिकारी चौकशी अधिकाऱ्याने व्यक्त केलेली मते लक्षात घेऊन स्वतःच्या निष्कर्षावर, नक्कीच येऊ शकते. परंतु शिस्तभंग प्राधिकरणाने "पुराव्यावर तपशीलवार चर्चा करावी आणि चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांना विरोध करावा" हे आवश्यक नाही. अन्यथा, शिस्तभंग प्राधिकरणाचे पद गौण स्तरावर जाईल.

या न्यायालयाने *ए. एन. डी. सिल्वा वि. युनियन ऑफ इंडिया,* [१९६२] सप्ल.१ एस. सी. आर. ९६८ मध्ये त्या संदर्भात कायदेशीर भूमिका मांडली आहे की, चौकशी अधिकाऱ्याचे निष्कर्ष किंवा त्याच्या शिफारशी शिक्षा करणाऱ्या प्राधिकारीवर बंधनकारक नाहीत. १९६३ साली या न्यायालयाच्या संविधानपिठाने, *युनियन ऑफ एफ इंडिया विरुद्ध एच. सी. गोयल.,* [१९६४] ४ एस. सी. आर. ७१८, मध्ये वरील स्थितीवर तोडगा काढला होता. न्यायपीठाने असा निर्णय दिला की, "सरकार अहवालाशी सहमत असू शकते किंवा ब अहवालात नोंदवलेल्या निष्कर्षापेक्षा पूर्णपणे किंवा अंशतः भिन्न असू शकते." न्यायमूर्तींनी खालील तत्त्व मांडलेः

> " जर अहवालात लोकसेवकाच्या बाजूने निष्कर्ष दिले गेले आणि सरकार सदर निष्कर्षांशी असहमत असेल आणि लोकसेवकाच्या विरोधात केलेले आरोप प्रथमदर्शनी सिद्ध झाले असतील, तर सरकारने लोकसेवकाला कोणती शिक्षा द्यावी हे तात्पुरते ठरवावे आणि त्याच्याविरुद्ध दुसरी नोटीस काढावी.”

अशा प्रकारे, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सदर प्रश्नाकडे योग्य दृष्टीकोनातून पाहिले नाही, जे तेव्हा स्पष्ट होते जेव्हा खंडपीठाने सांगितले की, शिस्तभंग समितीने पुराव्यावर तपशीलवार चर्चा करणे आणि चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षांना आव्हान देणे अनिवार्य आहे. उच्च न्यायालयाने संमत केलेल्या सुविचारित आदेशात खंडपीठाने केलेला

हस्तक्षेप हा प्रशासकीय बाजूने अनुच्छेद २२६ अंतर्गत त्यांच्या अधिकारक्षेत्राचे अतिक्रमण होते .

मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांचे पूर्ण न्यायमंडळाने त्या उच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांना शिस्तभंग समितीवर न्यायिक अधिकाऱ्यांच्या शिक्षेच्या संदर्भात उच्च न्यायालयाची कार्ये पार पाडण्यास अधिकृत केले आहे. अशा कार्यांमध्ये संविधानाच्या अनुच्छेद २३५ मध्ये नमूद केलेल्या अधिकारांचा वापर करणे समाविष्ट आहे. प्रशासकीय बाबींवर प्रत्येक उच्च न्यायालयाचे त्याच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या अधीनस्थ न्यायव्यवस्थेवर पहारा ठेवणे हे घटनात्मक कर्तव्य आहे. सर्व गैरकल्पित किंवा प्रेरित तक्रारींपासून प्रामाणिक न्यायिक अधिकाऱ्यांना संरक्षण देणे उच्च न्यायालयासाठी अत्यावश्यक असले तरी, अधीनस्थ न्यायपालिकेच्या सदस्याची कोणतीही अप्रामाणिक कामगिरी टाळणे उच्च न्यायालयाला परवडत नाही. अप्रामाणिकपणा हा न्यायालयीन प्रामाणिकपणाच्या अगदी विरुद्ध आहे. उच्च न्यायालयाने आपल्या एका अधिकाऱ्याच्या अप्रामाणिक कामगिरीला माफ करणे किंवा त्याच्याशी तडजोड केल्याचे कोणतेही उदाहरण म्हणजे न्यायिकव्यस्थेच्या पायाची झीज होण्यास हातभार लावेल. दर तासाला एखाद्याने स्वतःला आठवण करून दिली पाहिजे की न्यायपालिका मात्र त्याच्या प्रामाणिकपणावर लोकांचा असणारा विश्वास यावर उभारलेली असते .असा आत्मविश्वास हा असा पाया आहे ज्यावर न्यायपालिकेचे स्तंभ उभारले जातात.

नोकरशाही किंवा इतर सेवेतील सदस्यांप्रमाणे न्यायाधीश, कोणत्याही स्तरावरील, राज्य आणि त्याच्या प्राधिकाराचे प्रतिनिधित्व करतात. न्यायिक सेवा ही केवळ रोजगार नाही किंवा न्यायाधीश केवळ कर्मचारी नाहीत. ते सार्वभौम न्यायिक शक्तीचा वापर करतात. ते मोठ्या विश्वास आणि जबाबदारी असलेल्या सार्वजनिक पदांचे धारक असतात. जर एखाद्या न्यायालयीन अधिकाऱ्याने "न्यायाचे प्रमाण कमी केले तर त्याचा उलथापालथ करणारा परिणाम विनाशकारी आणि घातक ठरेल." अप्रामाणिक न्यायिक व्यक्तिमत्व हा एक विरोधाभास आहे. न्यायमूर्ती रामास्वामी यांनी मुंबई उच्च न्यायालय वि. शिर्शकुमार रंगराव पाटील, [१९९७] ६ एस. सी. सी. ३३९, मध्ये केलेल्या खालील निरीक्षणे आम्ही उद्धृत करू इच्छितोः

“भ्रष्टाचाराच्या लसीका गाठी (कर्करोगाच्या पेशी) न्यायपालिकेच्या महत्त्वाच्या रक्तवाहिन्यांमध्ये सतत शिरत राहतात आणि न्यायालयीन शस्त्रक्रियेद्वारे ते रोखण्याची गरज संविधानाच्या अनुच्छेद २३५, १२४(६) मध्ये नमूद केलेल्या नियंत्रणाच्या सिद्धांतांतर्गत स्वतः लादलेल्या किंवा सुधारात्मक उपाययोजनांद्वारे किंवा शिस्तभंगाच्या कारवाईद्वारे न्यायव्यवस्थेवर अवलंबून असते. सबब संबंधित उच्च न्यायालयाने आपल्या अधीनस्थ न्यायव्यवस्थेवर आणि आत्मपरीक्षणावर सतत लक्ष ठेवणे आवश्यक आहे.”

जेव्हा उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय बाजूने अशा संविधानिक कार्य पार पडले जाते, तेव्हा त्यावर कोणताही न्यायिक आढावा अत्यंत काळजीपूर्वक आणि सावधगिरीने तर घ्यावाच मात्र या न्यायालयाने वरील निर्णयांमध्ये ठरवलेल्या निकषांपुरता काटेकोरपणे मर्यादित ठेवण्यात यावा. सध्याच्या प्रकरणात, अपील अंतर्गत दिलेल्या निकालानुसार, मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने, उच्च न्यायालयाच्या शिस्तभंग समितीचा न्यायनिर्णय, प्रशासकीय बाजूच्या पाच न्यायाधीशांच्या न्यायनिर्णयावर खंडपीठाला अपील करण्याचे अधिकार असल्याप्रमाणे खोडून काढल्याचे दिसते. तथापि, खंडपीठाने प्रशासकीय बाजूने उच्च न्यायालयाने पारित केलेल्या अशा आदेशात हस्तक्षेप करून आपल्या अधिकारक्षेत्राच्या सीमा स्पष्टपणे ओलांडल्या आहेत.

सबब आम्ही हे अपील मान्य करतो आणि मुंबई उच्चन्यायालयाच्या खंडपीठाचा आक्षेपार्ह निकाल रदद् करतो.

व्ही. एस. एस.

अपीलाला परवानगी देण्यात आली.

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल.”